॥श्री राम समर्थ॥ ॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड मो. ९७६७०४०८४३ ७७४१०८४५४५
# श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, ब्रोकोली, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९७ वा | बुधवार, दि. ११ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

कृषी विषयक
मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.
संपर्क :
कुदरत ॲग्रो ऑरगॅनिक्स
9970115450

3000 Sq.ft. प्लॉट N.A. देणे आहे
शिनगारे सिटी सांगोला वासुद रोड, अल्टिमेट जिम च्या पूर्वेस
संपर्क :
डी. बी. शिंदे
9579421465

# अजित पवारांचा खून देवेंद्र फडणवीसांनी केला आहे काय ?

दत्तकुमार खंडागळे
मो. 9561551006

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूला एक महिना होवून गेला. ज्या दिवशी विमान अपघाताचा प्रकार झाला त्या क्षणापासून जवळपास अवघा महाराष्ट्र त्यांच्या मृत्यूबाबत साशंक आहे. महाराष्ट्रातल्या चार-दोन नव्हे तर करोडो लोकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकते आहे. हे कोट्यावधी लोक अजित पवारांच्या मृत्यूबाबत उलटसुलट चर्चा करताना दिसत आहेत. या तमाम लोकांना अजित पवारांचा मृत्यू हा अपघात नव्हे तर घातपात वाटतो आहे. त्यांचा मृत्यू नव्हे तर 'खून' च केला गेला आहे अशी मानसिकता या तमाम लोकांची आहे. अजित पवारांचा खून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमित शहा, मोदी, तटकरे आणि पटेल आदी गँगने केल्याची चर्चा राज्याच्या काना-कोपऱ्यात आहे. कोट्यावधी लोकांना असच वाटतय. त्यांना देवेंद्र फडणवीस, शहा व मोदी यांच्यावर शंका आहे. लोकं याबाबत उघड उघड चर्चा करताहेत. या पुर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री पद भुषवलेल्या गोपिनाथ मुंडे यांच्या मृत्यूबाबतही अशीच चर्चा होती पण मुंडेंच्या अपघाती मृत्यूपेक्षाही अजित पवारांचा अपघात मराठी मनाला पटताना दिसत नाही. लोक संभ्रमात आहेत. खरच अजित पवारांचा खून देवेंद्र फडणवीस आणि गँगने केला आहे काय ? या प्रश्नाच नेमकं उत्तर



महाराष्ट्राला कोण देणार ?

अजित पवारांच्या मृत्यूची तटस्थपणे चौकशी व्हावी. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई व्हावी. जे सत्य आहे ते जनतेसमोर यावे यासाठी आमदार रोहित पवार धडपडताना दिसत आहेत. त्यांनी पत्रकार परिषदा घेवून अपघातातल्या अनेक भोंगळ व संशयास्पद बाबीं स्पष्ट केल्या आहेत. रोहित पवारांनी उपस्थित केलेल्या अनेक प्रश्नांना उत्तर द्यायचे सामर्थ्य राज्य सरकारकडे नाही. रोहित पवार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी गेल्यावर त्याचा गुन्हा दाखल करायलाही नकार दिला गेला होता. जिथं कोंबड्या-कुत्री चोरीला गेल्याचे गुन्हे दाखल केले जातात तिथे राज्याच्या उपमुख्यमंत्र्याच्या मृत्यूबाबत गुन्हा दाखल करून घेण्यास टाळाटाळ का केली जाते? ते ही रोहित पवार यांच्यासारख्या आमदाराची तक्रार का नाकारली जाते? देशाचे संरक्षणमंत्री, कृषीमंत्री, राज्याचे मुख्यमंत्री अशी अनेक पदं भुषवलेल्या शरद पवारांचा





पुतण्या मरतो, त्याची तक्रार त्यांचा आमदार असलेला पुतण्या द्यायला जातो आणि पोलिस नकार देतात याचा अर्थ काय ? रोहित पवारांच्या चौकशीच्या मागणीवर भाजपवाल्यांना आक्षेप का आहे? भाजपवाले त्यांना या बाबत ट्रोल का करतात? विमानातला ब्लॅक बॉक्स गायब कसा होतो ? टिका झाल्यावर तो पुन्हा प्रकटतो कसा? अजित पवारांच्या विमानाचा पायलट अचानक कसा बदलतो? अजित पवारांचे नेहमीचे सुरक्षा रक्षक अचानक गायब कसे होतात? विमानात बसण्यापुवीर्चे मुंबईतले कुठलेच फुटेज का समोर येत नाही? अजित पवारांचे मृत शरिर इतके फुगलेले कसे? असे अनेक प्रश्न महाराष्ट्रातील जनतेला पडले आहेत. अजित पवारांच्या मृत्यूची तटस्थ व सखोल चौकशी व्हावी. नेमकं सत्य काय ते राज्याच्या जनतेसमोर यायला हवे. आंतरराष्ट्रीय स्तरावरून या अपघाताची चौकशी व्हावी ही मागणी एकट्या रोहित पवारांचीच नाही तर तमाम मराठी माणसाची ही मागणी आहे. नेमकं काय घडलय? अजित पवारांचा खरंच अपघात घडलाय की घातपात केलाय ? या बाबत लोकांना नेमकं आणि सत्य जाणून घ्यायचं आहे. राज्य सरकार या घटणेकडे गांभिर्याने पहायला तयार नाही. अजित पवारांचा मृत्यू झाल्या झाल्या सत्तेतले राज्यकर्ते राजकीय कुरघोड्या करण्यात दंग होते. अजित पवारांच्या मृत्यू नंतर तिस-याच दिवशी राज्याभिषेकाचा सोहळा या कारस्थानी लोकांनी आयोजित केला होता. अजित पवारांसारखा बलाढ्य नेता मरतो, त्याच्या मृत्यूच्या शोकात अवघा महाराष्ट्र बुडालेला असतो अशा स्थितीतही सत्तेचे सोहळे रंगवले जातात. शपथविधीची घाई, गडबड, धांदल, गुप्त खलबतं, डावपेच कशासाठी आणि कुणासाठी ? या मागचं कुटील राजकारण नेमकं काय आहे ? सत्तेच्या सारिपाटाचे डाव भडाग्नी विझण्याआधीच का रंगवले गेले? नेमकी ही धांदल



कशासाठी ? छत्रपती शिवरायांच्या मृत्यूची घटना लपवत संभाजी राजांना कैद करण्याची घाई करणारे तत्कालीन पंत कारभारी आणि अजित पवारांच्या मृत्यूनंतर तिस-याच दिवशी राज्याभिषेकाचा शपथविधी आयोजित करणारे राज्यातले कारभारी सारखेच कारस्थानी वाटताहेत. दोघांचाही हेतू स्वच्छ वाटत नाही.

राज्यातल्या कोट्यावधी जनतेच्या मनात संशय असेल तर राज्याच्या मुख्यमंत्री पदावर बसण्याचा नैतिक अधिकार देवेंद्र फडणवीसांना नाही. फडणवीस यांच्याकडे खरेच नैतिकता असेल तर त्यांनी राजिनामा देवून या प्रकाराची निष्पक्ष चौकशी करावी. एखाद्या आंतरराष्ट्रीय तपास यंत्रणेकडून या प्रकरणाचा तपास करावा. या तपासात ते जर निर्दोष सिध्द झाले तर त्यांनी पुन्हा दिमाखात राज्याच्या मुख्यमंत्री पदावर आरूढ व्हावं. आज कोट्यावधी लोक त्यांच्याकडे संशयाचे बोट दाखवत आहेत. या कोट्यावधी लोकांना असं वाटतय की फडणवीसांनीच अजित पवारांचा खून केला आहे. राज्यातील कोट्यावधी लोकांना फडणवीसाच्या बाबतीत असे वाटत असेल तर ही बाब गंभीर आहे. फडणवीसांनी याचा गांभिर्याने विचार करावा. फडणवीसांनी स्वतःबद्दल जरूर आत्मचिंतन करावं. अजित पवारांच्या मृत्यूबाबत लोकांनी फडणवीसांना संशयाच्या कटघऱ्यात उभं केलं आहे. फडणवीसांनी लोकांना याची निखळ उत्तर द्यावीत. या निमित्ताने लोकांच्या मनात आपलं राजकीय चारित्र्य काय आहे? याचा अंदाज देवेंद्र फडणवीसांनी घ्यावा. कायमस्वरूपी देवाभाऊ, देवाभाऊ करून त्यांचे तळवे चाटणारे सत्तालोभी व स्वार्थी चमचे म्हणजे जनता नव्हे याचे भान त्यांनी ठेवावे. देवेंद्र फडणवीस ज्या रामाचा आदर्श सांगतात त्या श्री रामाने लोकांच्यातली कुजबुज ऐकून बायकोला अग्निपरिक्षा द्यायला लावली होती. प्रिय सीतेला वनात सोडून दिले होते. जनतेच्या मनात काय चाललय ? याला इतक्या गांभिर्याने घेणाऱ्या रामाचे नाव घेवून राजकारण करणाऱ्या, "जय श्री राम" चे नारे देत राजकारण करणाऱ्या फडणवीसांनी जनतेप्रती रामासारखी बांधिलकी आणि नैतिकता दाखवून द्यावी. ते जर सच्चे रामभक्त असतील तर त्यांनी मुख्यमंत्री पदावर लाथ मारून बाजूला व्हावं.

विमान अपघात, विमान आणि हत्या हा प्रकार नवीन नाही. चारशे वर्षापुर्वी विमानाचा आधार घेत 'संत तुकाराम' महाराज यांचाही असाच खून करण्यात आला. संत तुकारामही विमान अस्त्राचे बळी ठरले होते. त्यांचा खून करून ते सदेह वैकुंठाला गेले अशी थाप इथल्या मंबाजी आणि त्यांच्या पिलावळींनी ठोकली होती. भोळ्या-भाबड्या मराठी मनाला भटशाहीने ते पटवून दिलं होतं. त्यासाठी पोथ्या-पुराणात आपल्या कवित्वाची बाळंतपण करत कथा-काव्ये रचली. ती तुकोबारायाच्या नावाने खपवली. आत्ताच्या काळात लोकं शिकलेली नसती किंवा सोळाव्या शतकासारखी भाबडी व धर्मभोळी असती तर कदाचित अजित पवारही सदेह वैकुंठाला गेले अशी थाप इथल्या काही जातीयवादी भामट्यांनी ठोकून दिली असती. आमच्या बहूजन समाजातल्या धर्मभोळ्या बावळ्यांनाही ते पटले असते. वैचारिक अंग गहाण टाकलेल्या या बावळ्यांनी ते प्रवचन-किर्तनातून सांगायलाही सुरूवात केली असती. पण इतकी लबाडी पचणार नाही हे या लोकांच्या लक्षात आले असल्याने किमान अजित पवारांचा अपघात झाला असं तरी सांगितल जातय. अन्यथा हजारो वर्षाचां इतिहास पाहता त्यांनाही सदेह वैकुंठाला धाडलं गेलं असत. संत तुकोबारायांसारखे अजित पवारही विमानास्त्राचे बळी ठरलेत काय ? असा प्रश्न अवघ्या महाराष्ट्रला पडला आहे. या प्रश्नाचे नेमके आणि सत्य उत्तर महाराष्ट्राला मिळायलाच हवे. हा जनतेचा हक्क आणि अधिकार आहे.

# देसाईनगर येथे २० एमएलडी क्षमतेचे मलनिसारण केंद्र अंतिम टप्प्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने केंद्र शासनाच्या अमृत-१ (AMRUT) योजनेअंतर्गत देसाईनगर येथे उभारण्यात येत असलेले २० एमएलडी क्षमतेचे अत्याधुनिक मलनिसारण प्रक्रिया केंद्र (STP) अंतिम टप्प्यात आले आहे. या प्रकल्पाची महापौर विनायक कोंड्याल व आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामांचा आढावा घेतला.

या प्रकल्पाद्वारे शहरातील सांडपाण्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करून पर्यावरणपूरक व्यवस्थापन करण्याचा उद्देश आहे. मलनिसारण केंद्रातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेल्या टाक्या, प्रायमरी सेंट्रीफ्युज युनिट, क्लोरीन युनिट आणि ब्लोअर रूम आदी महत्त्वाची कामे मक्तेदार दास ऑफशोर यांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली आहेत.

तसेच सांडपाणी उचलण्यासाठी आवश्यक असलेले पंप हाऊस व वीज यंत्रणेचे कामही जवळपास पूर्ण झाले आहे. या अंतर्गत ट्रान्सफॉर्मर, डिझेल जनरेटर, मेकॅनिकल स्क्रीन, इलेक्ट्रिक क्रेन आणि एचडी पॅनल यांसारख्या यंत्रणांची उभारणी मक्तेदार सुहास इलेक्ट्रिकल यांच्या मार्फत करण्यात आली आहे.



मलनिसारण केंद्र सुरळीतपणे चालविण्यासाठी आवश्यक असलेली ११ केव्ही विद्युत जोडणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (टरएऊछ) कडून मिळण्यासाठी महापालिकेकडून कार्यवाही सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, व्यंकटेश कोंडी, सिद्धेश्वर कमटम, सात्विक बडवे यांच्यासह सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, सहाय्यक अभियंता नितीन आंबीगार, रामचंद्र पेंटर, झोन अधिकारी नंदकुमार जगदाणी उपस्थित होते.

तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (पान 2 वर..)

# व्यावसायिक गॅस सिलिंडरचे बुकिंग तात्पुरते बंद

## घरगुती सिलिंडरसाठी २५ दिवस थांबावे लागणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** युद्धाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात गॅस सिलिंडर वितरणाचे नियोजन अधिक कडक करण्यात आले आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरचे बुकिंग तात्पुरते बंद करण्यात आले आहे. घरगुती सिलिंडर बुकिंगनंतरचा प्रतीक्षा कालावधी २५ दिवसांचा करण्यात आला आहे.

नागरिकांनी अतिरिक्त साठवणूक करू नये आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

सोलापूर जिल्हा प्रशासनामार्फत मंगळवारी (ता. १०) गॅस कंपन्यांच्या समन्वय अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन जिल्ह्यातील गॅस वितरण एजन्सीधारकांचा आढावा घेण्यात आला. सोलापूर जिल्ह्यात ग्रामीण भागासह



### दररोजची गरज २६० मेट्रिक टन

सोलापूर जिल्ह्यात फेब्रुवारी २०२६ अखेरपर्यंत ११ लाख ८८ हजार २५८ घरगुती गॅस ग्राहक असून १० हजार ८०० व्यावसायिक ग्राहक आहेत. जिल्ह्याची घरगुती गॅसची दैनंदिन गरज सुमारे २५० मेट्रिक टन, तर व्यावसायिक गॅसची गरज १० मेट्रिक टन इतकी आहे.

एकूण ९४ गॅस एजन्सी कार्यरत आहेत. त्यामध्ये बीपीसीएलच्या ५४, एचपीसीएलच्या २० आणि आयओसीएलच्या २० एजन्सी आहेत. बैठकीत आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस वितरण नियमांमध्ये काही बदल करण्यात आल्याची माहिती समन्वय अधिकाऱ्यांनी दिली.

त्यानुसार व्यावसायिक वापरासाठी देण्यात येणाऱ्या गॅस सिलिंडरचे बुकिंग पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. मात्र शासकीय संस्था, रुग्णालये, एनटीपीसी आणि अन्नछत्र मंडळांना या नियमातून सूट देण्यात आली आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरबाबत पुढील निर्णय उच्चस्तरीय चर्चेनंतर घेण्यात येणार आहे. घरगुती गॅस सिलिंडरचे वितरण करताना ग्राहकांना कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या ओटीपीची पडताळणी अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच ई-केवायसी प्रक्रियाही करण्यात येणार आहे, जेणेकरून सिलिंडरचा गैरवापर होऊ नये. जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून गॅस वितरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुका स्तरावर दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. ही पथके गॅस एजन्सींची तपासणी करून सिलिंडरची दैनंदिन आवक-जावक तपासणार आहेत तसेच काळाबाजार रोखण्यासाठी उपाययोजना करणार आहेत.

**'हे' आहेत गॅस वितरणातील प्रमुख बदल....**

- व्यावसायिक गॅस सिलिंडरचे बुकिंग तात्पुरते बंद
- घरगुती सिलिंडर बुकिंगनंतर २५ दिवस प्रतीक्षा
- वितरणावेळी ओटीपी पडताळणी अनिवार्य
- ई-केवायसी प्रक्रिया राबविणार
- काळाबाजार रोखण्यासाठी तालुका स्तरावर दक्षता पथके

# बांगलादेशी नागरिकांना परवाने दिल्याच्या तक्रारी

## नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना स्थगिती- परिवहन मंत्री सरनाईक

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी तसेच बांगलादेशी नागरिकांना परवाने दिल्याच्या तक्रारी मिळाल्या असल्याचे सांगत आजपासून (९ मार्च) नवीन ऑटो रिक्षा परवाने देण्यास स्थगिती देण्यात आल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर परवाने द्यावेत याबाबत निर्णय घेतला जाणार असून त्यानुसार पुढील धोरण निश्चित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडे आहेत. केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयानेही स्थानिक



परिस्थितीनुसार निर्णय घेण्यास राज्य शासनाला मुभा दिली आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या काही ऑटो रिक्षा परवान्यांबाबत गंभीर तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत. काही ठिकाणी एकाच घरातील अनेक सदस्यांना परवाने देण्यात आले असल्याचे तसेच काही परवाने बांगलादेशी नागरिकांना अवैध पद्धतीने देण्यात आल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

राज्यातील नागरिकांना अधिक चांगली आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन लवकरच आवश्यक धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

**राज्यात सुमारे १४ लाख ऑटो रिक्षा परवाने**

- राज्यभरात आतापर्यंत सुमारे १४ लाख ऑटो रिक्षा परवाने देण्यात आले.
- काही ठिकाणी एकाच कुटुंबातील अनेकांना परवाने देण्यात आल्याच्या तक्रारी.
- बांगलादेशी नागरिकांना अवैधरित्या परवाने दिल्याचे आरोप.
- मोठ्या शहरांमध्ये वाहतूक कोंडी व प्रदूषण वाढल्याची चिंता.
- नवीन धोरण निश्चित होईपर्यंत नवीन परवाने देण्यास स्थगिती.

# सोलापूरमध्ये उड्डाणपुलासाठी भूसंपादनाला वेग

## भूसंपादनासाठी १०६ कोटींची तरतूद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील जुना पुना नाका ते पत्रकार भवन चौक दरम्यानच्या उड्डाणपुलाच्या भूसंपादनात रेल्वे आणि विभागाची जमीन बाधित होत आहे.

ही जमीन ताब्यात घेणे आणि मूल्यांकन करणे यासंदर्भात महापालिकेने पत्र दिले आहे. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी भूसंपादनातील प्रलंबित विषयांवर चर्चा करण्यासाठी मुंबईतून आढावा बैठक घेतली होती. या बैठकीनंतर भूसंपादनाच्या हालचालींना वेग आला आहे.

रेल्वे स्टेशन परिसर, पोस्ट विभागाची जमीन या कामात बाधित होणार आहे. या जमिनींचे मूल्यांकन (पान 2 वर..)

# सोलापुरात बनावट नोटांचा सुळसुळाट

## पोलिसांकडून विक्री करणारी टोळी जेरबंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागपूरच्या कामठीनंतर आता सोलापुरात बनावट नोटांचा सुळसुळाट सुरू असल्याची माहिती हाती आली आहे.

बनावट नोटा छापणाऱ्या टोळीला सोलापुरात जेरबंद करण्यात आलं आहे. बाजारात बनावट नोटा आढळू लागल्याने नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे. नागरिकांकडून बनावट नोटा तयार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

सोलापुरात बनावट नोटा तयार करू बाजारात विक्री करणारी टोळी जेरबंद करण्यात



आली आहे.सोलापूरच्या बाजारात बनावट चलन चालवण्याचा डाव फसल्याचे समोर आलं आहे. सोलापुरातील जेलरोड पोलिसांनी एक लाख दहा हजार रुपये किंमतीच्या पाचशे रुपयांच्या बनावट नोटा पकडल्या. यावेळी जेलरोड पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली. बनावट नोटा प्रकरणाचे कनेक्शन सांगोल्यापर्यंत असल्याची माहिती मिळत आहे. (पान 2 वर..)

## संपादकीय

# आर्थिक संकटाची चाहूल

सध्या सुरू असलेल्या युद्धाचा भारतावर विपरीत आर्थिक परिणाम व्हायला सुरुवात झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचा भाव प्रति बॅरल 110 डॉलरवर गेला आहे. सुमारे आठ दिवसांत हा भाव दुपटीने वाढला आहे.

त्यामुळे मोठ्या इंधन दरवाढीचे संकट तर आहेच पण त्याचबरोबर इंधनाच्या उपलब्धतेचेही मोठे संकट देशावर घोंगावत आहे.

या युद्धाचे अन्यही आर्थिक दुष्परिणाम दिसू लागले असून शेअर बाजारात तर अक्षरशः हाहाकार उडाल्यासारखी स्थिती आहे. गेल्या सुमारे दहा दिवसांत शेअर बाजार आठ टक्क्यांहून अधिक कोसळला. आज एका दिवसात तो साधारणपणे 1800 ते 2000 अंकांनी कोसळल्याच्या स्थितीत होता. या सगळ्या पडझडीत गुंतवणूकदारांचे गेल्या काही दिवसांत जवळपास 20 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

या युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळीसुद्धा कोलमडून पडली असून त्याचेही अन्य दुष्परिणाम भारताला भोगावे लागणार आहेत. सगळ्यात मोठे संकट इंधनाचे आहे. आखाती देशातून होणारा इंधनपुरवठा विस्कळीत झाल्याने त्याचे दर 110 डॉलरच्या पातळीवर गेले असून ते या पुढील काळात आणखी किती वाढणार आहेत याचा अंदाज कोणीही लावू शकत नाही.

आता इतक्या मोठ्या दराने तेल विकत घेऊन ते भारतीय ग्राहकांना सध्याच्या भावाच्या पातळीत पुरवणे सरकारला शक्य होणार नसल्याने इंधन दरवाढ अटळ आहे हेही सगळे गृहीत धरून चालले आहेत. कालच घरगुती स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात 60 रुपयांनी वाढ झाली. त्याखेरीज गॅस सिलेंडर उपलब्धतेची मर्यादाही कमी करण्यात आली असून आता महिन्याला फक्त एकच सिलेंडर मिळू शकेल आणि त्याशिवाय एकदा गॅस सिलेंडर बुक केल्यानंतर किमान 30 दिवस पुढचा गॅस सिलेंडर नोंदवता येणार नाही अशीही नवीन नियमावली लागू करण्यात येत आहे.

केंद्र सरकारने सध्या उपलब्ध असलेला गॅस केवळ घरगुती ग्राहकांसाठीच राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला असून उद्योगांसाठी होणारा एलपीजी गॅस पुरवठा अत्यंत मर्यादित किंवा जवळपास बंद करत आणला आहे. कच्च्या तेलाच्या बाबतीत स्थिती अशी आहे की जरी आपल्याला आखातातून कच्चे तेल आयात करायला अडचण आली तरी रशियाकडून तेल आयातीला आपल्याला अनुमती मिळाली आहे, अर्थात ही अनुमती 30 दिवसांसाठीच आहे आणि रशियाची जी जहाजे तेल घेऊन ऑलरेडी समुद्रात उभी आहेत त्यांच्याकडूनच आपल्याला हे तेल घ्यावे लागणार आहे.

त्यामुळे एक बाब सोयीची झाली आहे की आपल्याला तेलाची कमतरता भासणार नाही, पण दुसरा आणखी एक असा धोका आहे की रशिया आपल्याला आता पूर्वीसारखे स्वस्त दरात हे तेल देणार आहे की नाही हा मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण भारत, अमेरिकेने दिलेल्या परवानगीनुसार रशियाकडून हे तेल आयात करीत असल्याने रशियासुद्धा आता व्यापारी वृत्तीने आपले हात धुऊन घेण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे आपल्याला हे रशियन तेल आंतरराष्ट्रीय दरानेच घ्यावे लागण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे इंधन महागाईसुद्धा आता अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे.

या सगळ्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी केंद्र सरकारकडे नेमकी काय उपाययोजना आहे याचे आकलन झालेले नाही. आज संसदेचे कामकाज सुरू झाल्यानंतर या सगळ्या विषयावर सविस्तर तातडीची चर्चा घ्या अशी मागणी करत विरोधी पक्षाने लोकसभेत गोंधळ घातला, पण सरकारने या विशेष चर्चेला अनुमती देण्याऐवजी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांना या स्थितीबाबत संसदेच्या दोन्ही सभागृहात निवेदन करायला सांगितले.

जयशंकर यांनी डिप्लोमॅटिक पद्धतीचे निवेदन करून, सरकारचे या सगळ्या परिस्थितीवर लक्ष आहे आणि देशातील ग्राहकांना इंधनपुरवठा करण्याला आमची प्राथमिकता आहे असे मोघम उत्तर देऊन वेळ मारून नेली; पण त्यातून कोणाचेही समाधान झालेले नाही. सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, कच्च्या तेलाचा दर 110 डॉलरच्या पुढे गेल्यानंतर सरकार त्याच प्रमाणात आता पेट्रोल, डीझेलच्या किमती वाढवणार की सध्याच्याच दराने ग्राहकांना हे इंधन पुरवणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर अगदी कमी झाले होते त्यावेळी त्याचा लाभ ग्राहकांना होऊ न देता सरकारने त्यावर वेगवेगळ्या टप्प्यात उत्पादनशुल्कात वाढ करून ग्राहकांना मिळणारा लाभ परस्पर काढून घेतला होता. आता महागड्या दराने तेल खरेदी करावे लागत आहे अशी सबब सांगून आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या देशातील जनतेला केंद्र सरकारने आणखी अडचणीत आणू नये.

त्याऐवजी मधल्या काळात जी उत्पादनशुल्क वाढ केली होती ती कमी करून पेट्रोल डीझेलचे दर स्थिर ठेवावेत अशीच देशातील जनतेची मागणी असणार. कारण चारही बाजूने सुरू असलेली महागाईची होरपळ सहन करणे आता जनतेच्या आवाक्याच्या बाहेर जाऊ लागले आहे. त्यामुळे इंधन दरवाढीच्या झळा सर्वसामान्यांना सोसाव्या लागू नयेत याची काळजी सरकारने घ्यायला हवी. बाकी एकूण जे आर्थिक संकट येऊ पाहत आहे त्याबाबतही सरकारने आता विरोधकांनाही विश्वासात घेऊन जबाबदारीचे दर्शन घडवणे आवश्यक आहे.

# वारकऱ्यांचा स्वामींना दासबोध



**ज्ञानेश महाराव**
(ज्येष्ठ पत्रकार)



**नामदेव- ज्ञानदेव, एकनाथ- तुकाराम ह्या संतांनी सशक्त केलेला 'वारकरी संप्रदाय' महाराष्ट्रात कार्यरत असताना रामदास स्वामींनी आपल्या 'बजरंग भक्ती संप्रदाय'ची वेगळी चूल मांडली. असे असताना या दोन संप्रदायांच्या ग्रंथांची एकत्रित मापे काढण्याची खोडसाळपणा स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी का केला ?.**

संतकृपा झाली।
इमारत फळा आली॥
ज्ञानदेवे रचिला पाया।
उभारिले देवालया॥
नामा तयाचा किंकर।
तेणें विस्तार केला॥
जनार्दनी एकनाथ।
स्तंभ दिला भागवत॥
तुका झालासे कळस।
भजन करा सावकाश॥

अशा नेमक्या शब्दांत संत तुकाराम महाराज यांच्या शिष्या संत बहिणाबाई (पाठक) यांनी वारकरी संप्रदायाचा वाढ- विस्तार सांगितला आहे. केवळ २८ शब्दांत वारकरी संप्रदायाचा आढावा घेणाऱ्या संत बहिणाबाईंना समकालीन रामदास स्वामी यांचे जीवनकार्य नक्कीच ठाऊक असणार! तरीही त्यांनी समर्थ रामदासांची तुलना वारकरी संतांशी करण्याचा खोडसाळपणा केला नाही. तो खोडसाळपणा अयोध्येच्या "श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट"चे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी केला.

फेब्रुवारीच्या अखेरीस "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ"मध्ये "ज्ञानोबा ते तुकोबा" ह्या विषयावर तीन दिवसांचे राष्ट्रीय चर्चासत्र झाले. त्यामध्ये स्वामी गोविंद देव गिरी यांचे बीजभाषण होते. आपल्या ह्या भाषणात त्यांनी ओढूनताणून रामदास स्वामींचा "दासबोध" ग्रंथ आणला आणि त्याची तुलना वारकरी संप्रदायातील संतांच्या ग्रंथांशी केली. त्याचं म्हणणं, "ग्रंथ रचनेच्या प्रमाणानुसार, 'ज्ञानेश्वरी' हे भगवद्गीतेवरील भाष्य आहे. संत एकनाथांचे 'श्री एकनाथी भागवत' हेदेखील श्रीमद्भागवत पुराणाच्या ११ व्या स्कंधावरील भाष्य आहे. तर संत नामदेव व संत तुकोबांच्या 'अभंग गाथा' हे संकलन (संपादित केलेला संग्रह) आहे. संत रामदासांचा 'दासबोध' ही मात्र स्वतंत्र ग्रंथ रचना आहे. सर्व संतांविषयी आदर बाळगून आपण ही तुलना अकॅडमिक स्तरावर करीत आहोत," असेही ते म्हणाले. तरीही त्यातील तुच्छता उघडी पडल्याने वारकरी संप्रदायातून टीका झाली.

चार मार्च रोजी देहू येथे झालेल्या "विराट हिंदू संमेलन"चे ते प्रमुख वक्ते होते. ज्ञानेश्वरी आणि संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम यांच्या अभंग गाथांना "ग्रंथश्रेष्ठ" मानून ते भक्तिभावाने पठण करणाऱ्या वारकऱ्यांच्या गोविंद देव गिरींच्या वादग्रस्त विधान विषयीच्या भावना; "संत तुकाराम महाराज देहू संस्थान"चे माजी विश्वस्त नितीन महाराज मोरे यांनी "विराट हिंदू संमेलन"च्या संयोजकांना कळविल्या. दरम्यान, स्वामींनी आधी दिलगिरीचे आणि नाते क्षमायाचनेचे निवेदन केले. पण तो आपले वादग्रस्त विधान हे "ब्रह्मवाक्य" असल्याच्या ताठ्यात केलेला शब्दच्छल ठरला. "दासबोध"च्या आधी संत ज्ञानेश्वरांचा "अमृतानुभव" आणि संतकवी मुकुंदराज यांच्या "विवेकसिंधु" ग्रंथाचा उल्लेख राहून गेला, अशी सारवासारवही त्यांनी केली. परंतु, त्यातूनही त्यांची नामदेव- एकनाथ- तुकाराम यांच्यापेक्षा ज्ञानेश्वरांना वेगळे ठरवणारी मखलाशी लपून राहिली नाही. परिणामी –

गाजराची पुंगी।
तसे नवे जाले जोगी॥
काय करोनी पठन।
केली अहंता जतन॥
अल्प असे ज्ञान।
अंगी ताठा अभिमान॥
तुका म्हणे, करा बंड।
त्याचे हाणोनि, फोडा तोंड॥

हा संत विचार (गाथा : ओवी क्र. २८५४) वारकरी आचरणात आणतील, ह्या भयास्तव स्वामींनी "विराट हिंदू संमेलन"ला येण्याचे टाळले.

स्वामींचा हा खोडसाळी रामदासी प्रचार नवीन नाही. अहिल्यानगरच्या (अहमदनगर) 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'तही त्यांनी "वारकरी- रामदासी वाद मिटला पाहिजे" यावर दोन तास रडं घातलं होतं. ७६ वर्षांच्या स्वामी गोविंद देव गिरी हे ह्यांचे मूळ नाव किशोर मदनगोपाळ व्यास. ह्याच नावाने ते पूर्वी प्रवचने करीत. "स्वाध्याय"कार पांडुरंगशास्त्री आठवले यांचे ते शिष्य. शास्त्रीजींच्या ठाणे येथील 'तत्त्वज्ञान विद्यापीठ'मध्ये त्यांनी तत्त्वज्ञानात "मास्टर' डिग्री पूर्ण केली आणि त्यानंतर वाराणशीत जाऊन वेद, उपनिषदे आणि प्राचीन धार्मिक शास्त्रांचा अभ्यास करून "दर्शनाचार्य" ही पदवी प्राप्त केली. सध्या ते संघ-भाजप प्रणित कथित संत- महंतांच्या गोतावळ्यातील "स्टार प्रचारक" आहेत. पण वादग्रस्त विधानाने त्यांचा जातीनिशी असलेला "रामदासी बाणा" उघडा पडला.

वेद हे ऋचांचे संकलन आहे. तरीही वेदांना ग्रंथ म्हणतात. त्याच न्यायाने ज्ञानेश्वर - एकनाथ यांच्या भाष्य लेखनाला आणि नामदेव- तुकाराम यांच्या अभंग संकलनाला ग्रंथ न म्हणणे, हा स्वामींचा आध्यात्मिक कुजकटपणा ठरतो. याउलट, संत बहिणाबाई संत तुकारामांच्या "अभंग गाथा"ला "पाचवा वेद" म्हणत आपली आध्यात्मिक भव्यता दाखवतात. गेली १२ वर्षे "संघ-भाजप"परिवाराची बटिक असल्यासारखा "गोदी मिडिया" राबत आहे. ते काम कथित साधू- संतांची झुंड करीत आहे. त्यापैकी एक स्वामी गोविंद देव गिरी आहेत. त्यांच्या अकलेने हिंदूंनी वागायचे ठरवल्यास ऋग्वेद ते संत निळोबा महाराज यांच्यापर्यंतचे ९०% ग्रंथ बाद होतील.

'वारकरी संप्रदाय' आणि 'रामदासी संप्रदाय' हे महाराष्ट्र धर्म- संस्कृती समृद्ध करणारे असले, तरी दोन्हींत मूलभूत भेद आहेत. वारकरी संप्रदायाची निर्मिती करताना संत नामदेव- ज्ञानदेव यांनी वेदांचा क्लिष्ट बडेजाव बाजूला सारला आणि सामान्य लोकांना समजेल अशा मराठी भाषेत अभंग- ओव्या लिहून ईश्वराची भक्ती करण्याची सोय उपलब्ध करून दिली. वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी जातीभेद, वर्ण्यभेद, अनिष्ट प्रथा आणि ब्राह्मणवादी कर्मठतेला विरोध केलाय. 'विठ्ठल' या दैवताच्या रूपाने सर्वांसाठी भक्तीचे द्वार खुले केलेय. ह्या सर्वसमावेक समतावादी संत मालिकेत सामील होण्याऐवजी रामदास स्वामींनी स्वतःला वेगळे ठेवले; वेगळा पंथ काढला, ह्यातूनच वारकरी आणि रामदासी संप्रदायातील भेद स्पष्ट होतो. त्यामुळे दोघांत तुलना करणे, हा खोडसाळपणा ठरतो.

स्वामी गिरींनी 'दासबोधा'ची वारकरी संतांच्या ग्रंथांशी केलेली तुलना ही पहिलीच नाही. यापूर्वी "महाराष्ट्र सारस्वत"कार वि. ल.भावे यांनी "समर्थ रामदास आणि संत तुकाराम" अशी तुलना केलीय. ती अप्रस्तुत ठरली. त्याही अगोदर वि.का. राजवाडे, ल. रा. पांगारकर यांनी "रामदास स्वामींना छत्रपती शिवरायांचे गुरू" बनवण्याचा आटापिटा केला आहे. ह्याच सनातनी माळेतल्या "भाला"कार भोपटकर यांनी "वारकऱ्यांनी (एकादशीला) शेंगदाणे खाऊन महाराष्ट्राचे वातावरण प्रदूषित केले आहे," अशी वारकरी संप्रदायाची हेटाळणी केली होती. ती रामदास स्वामींच्या श्रेष्ठत्वाचे प्रदर्शन करण्यासाठी होती. नामदेव- ज्ञानदेव, एकनाथ- तुकाराम ह्या संतांनी सशक्त केलेला 'वारकरी संप्रदाय' महाराष्ट्रात कार्यरत असताना रामदास स्वामींनी आपल्या "बजरंग भक्ती संप्रदाय"ची वेगळी चूल मांडली. 'मारुती' हे शक्ती-बुद्धीचे दैवत. बहुजनांचा जवळचा देव. परंतु ब्रह्मचर्य उपासनेसाठी रामदासांनी त्याला सोवळ्यात गुंडाळला आणि आपल्या समाजासाठी वापरला. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' अशी आग्रही भूमिका घेणाऱ्या वारकरी संप्रदायाने 'समतेचं सूत्र' स्वीकारलं होतं. म्हणूनच वारकरी संप्रदायात सर्व जातींचे 'संत' झाले. त्यांनी 'शिखासूत्र' (शेंडी) दाखवीत वर्ण्यवर्चस्व व्यवस्थेवर हल्ले केले.

गुरू आणि मंत्र-तंत्रावर प्रहार करताना-

जरि मंत्रेची वैरी मरे ।
तरी वाया का बांधावी कट्यारे ॥
रोग जाय दूध-साखरे ।
तरी निंब का पियावा॥

असा रोकडा प्रश्न संत ज्ञानेश्वरांनी (ज्ञानेश्वरी अध्यायः ४) देव-धर्म कर्मकांडींना विचारलाय! तर, संत तुकोबांनी-

जे करिती गुरू गुरू ।
भोवती भारू शिष्यांचा-
पुस नाही पाय चार ।
मनुष्यपरी कुत्री ती-

असं सांगून गुलाम बनविणाऱ्या गुरू परंपरेपासून दूर राहण्याचा उपदेश केलाय. याउलट, रामदास स्वामी (दासबोधः दशक ५, समास१, ओवी ६ मध्ये) म्हणतात-

गुरू तो सकलाशी ब्राह्मण ।
जरी तो झाला क्रियाहीन-
तरी तयासीच शरण।
अनन्यभावे असावे॥

म्हणजे, 'गुरू' कितीही असमर्थ असला तरी तो ब्राह्मण असावा, असा जातीनिष्ठ आग्रह रामदासांनी धरलाय. देव- धर्माच्या नावानं भटा- ब्राह्मणांची "रोजगार हमी योजना" कायम सुरू राहावी, याची काळजी घेत रामदास स्वामींनी दासांना आपलं बोधामृत पाजलंय. म्हणूनच 'रियासत'कार गोविंद सखाराम सरदेसाई म्हणतात, "कोणतेही प्रगतीपोषक विवेचन समर्थ रामदासांच्या ग्रंथात आढळत नाही. त्यांचे ग्रंथ 'पंचतंत्र', 'इसापनीती' यांच्या मालिकेतील सामान्य नीतीचे म्हणून गणता येतील."

असो. म्हणून रामदास स्वामींचे कार्य आणि लेखन कमअस्सल ठरत नाही. ते आपल्या जागी श्रेष्ठच आहेत. "दासबोध" ह्या ग्रंथाची रचना सुलभ आणि आकर्षक आहे. ह्यात अध्यायासारखे विषयानुरूप २० "दशक" आहेत. प्रत्येक दशकात एक "समास" आणि प्रत्येक समासात एक "विचार" आहे. असे "पूर्वार्ध आणि उत्तरार्ध"चे प्रत्येकी १० दशकं आहेत. पूर्वार्धात "सिद्धान्त" आणि उत्तरार्धात "व्यवहार" आहे. तो लोककल्याणाचा आहे. "दासबोध" हा "ज्ञानेश्वरी"सारखा श्रोत्यांसमोर सांगितलेला ग्रंथ नाही. तो शिवथर घळीच्या एकांतात बसून शिष्य कल्याण यास सांगितलेला ग्रंथ आहे.

'दासबोधा'च्या सातव्या "दशक"मध्ये शेवटास (समास १०; ओवी ४२) रामदास स्वामी म्हणतात –

सरली शब्दांची खटपट।
आता ग्रंथाचा सेवट। (शेवट)
येथे सांगितले पष्ट।(स्पष्ट)
सदगुरू भजन॥

असे जर असेल तर त्यापुढील १३ दशकांचे काय? ते स्वतंत्र आणि स्फुट लेखन असल्याचे सांगितले जाते. म्हणजे, तेही संकलन ठरते. ह्याचा अर्थ, स्वामी गोविंद देव गिरी यांच्या व्याख्येनुसार, 'दासबोध' हा ग्रंथ ठरत नाही. तथापि, वरील चार ओळीतून स्वतः रामदास स्वामी "दासबोध" हा ग्रंथ असल्याचे स्पटपणे सांगत आहेत. तेच "सार्थ ज्ञानेश्वरी"मध्ये अखेरच्या १८ व्या अध्यायात संत ज्ञानेश्वर म्हणतात –

सरली ग्रंथाची खटपट।
पूर्ण जाली मनोरथ सुहाट।
आता अवधारा यथार्थ।
ग्रंथार्थ हा॥

(अर्थः सुहाट = सुंदर प्रकारे; अवधारा = नीट ऐकून/समजून घ्या; ग्रंथार्थ = ग्रंथाचा खरा अर्थ.)

"ज्ञानेश्वरी"तील समारोपाच्या ओवीची छाप "दासबोध"मध्येही उमटावी, हा कुठला योग झाला? संत ज्ञानेश्वर 'पसायदाना'तूनही अखेरीस सांगतात-

आणि ग्रंथोपजीविये।
विशेषी लोकी इये।
दृष्टादृष्टविजयी। होवावे जी॥
पुढती पुढती पुढती।
इया ग्रंथपुण्यसंपत्ती।
सर्वसुखी सर्वभूती।
संपूर्ण होईजे॥

संत ज्ञानेश्वर आणि रामदास स्वामी आपल्या लेखनाला "ग्रंथ" म्हणत असतील, तर त्यांची अनावश्यक तुलना करून स्वामी गोविंद देव गिरी यांनी "गाढवाचार्य" होण्याचा अट्टहास का केला आहे?

## सोलापूरमध्ये उड्डाणपुलासाठी...

करण्याचे काम सुरू आहे. या कामात सहकार्य करणे, तातडीने जमीन ताब्यात देण्यासाठी कार्यवाही ठेवणे यासाठी पालिकेच्या अधिकाऱ्यांनी रेल्वे आणि टपाल विभागाला अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे.या दोन्ही विभागाचे अधिकारी यासाठी सकारात्मक असल्याचे नगररचना कार्यालयातून सांगण्यात आले. सोलापूर शहरातील जुना पुना नाका ते पत्रकार भवन आणि जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला या दोन महत्त्वाच्या उड्डाणपुलांचे काम भूसंपादन, शासकीय विभागांकडून जागा मिळण्यास विलंब आणि निधीच्या अडथळ्यांमुळेगेल्या ८ ते १० वर्षांपासून रखडले आहे. यामुळे नागरिक, विशेषतः टाकळी बायपास परिसरातील लोक, वाहतूक कोंडीमुळे त्रस्त झाले आहेत.

जुना पुना नाका ते पत्रकार भवन (फेज १) आणि जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला (फेज २) या प्रकल्पांसाठी १३ सरकारी विभागांच्या ५१ जागांचे भूसंपादन प्रलंबित आहे. आठ वर्षांपासून दोन उशणपुलांचे काम रखडलेजुना पुना नाका ते पत्रकार भवन हे ५.४५ किलोमीटर अंतर फेज वन तर जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला हे पाच किलोमीटर अंतर फेज टू असे दोन उड्डाणपूल होणार आहेत. उड्डाणपुलांमध्ये एकूण १३३ मिळकती बाधित होणार आहेत. यामध्ये शासकीय, निमशासकीय मिळकतींचा समावेश आहे. शासकीय आणि निमशासकीय अशा १३ विभागांनी अद्याप जागा ताब्यात दिल्या नाहीत. त्यामुळे गेल्या आठ वर्षांपासून दोन उड्डाणपुलांचे काम रखडले आहे.

टाकळी बायपासवरील रेल्वे उड्डाणपुलाचे काम जमिनीच्या हद्दीत खांब आल्याच्या कारणास्तव वर्षभरापासून अडकले आहे. महापालिकेला भूसंपादनाचा ३० टक्के हिस्सा भरण्यास अडचणी येत असल्याने प्रकल्पाचा खर्च वाढला आहे.

बाळे येथील उड्डाणपुलाचे काम अपूर्ण राहिल्याने त्या भागात वाहतूक सुरळीत होत नाही. या विलंबामुळे शहरातील वाहतूक कोंडीत भर पडून अपघातांची मालिका सुरू झाली आहे. प्रशासनाने भूसंपादनासाठी १०६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, मात्र तरीही काम पूर्ण होण्यास आणखी वेळ लागण्याचीशक्यता आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून शहरात दोन उड्डाणपूल प्रस्तावित आहेत. या उड्डाणपुलांमध्ये बाधित होणाऱ्या मिळकतीच्या भूसंपादनासाठी १०६ कोटींची गरज आहे. यामध्ये फेज एकसाठी ७० कोटी तर फेज दोनसाठी ३५ कोटी लागणार आहेत. महापालिका प्रशासनाकडे १०९ कोटी रुपये आहेत.

पहिल्या टप्प्यातील फेज वनची भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ऑवर्डही निघाले आहेत. यासाठी ७० कोटी रुपए लागणार आहे. निवाड्याचा एक वाद शिल्लक आहे. तो सध्या विभागीय आयुक्तांकडे आहे. १० कोटींचा निवाडा आहे. तर पहिल्या टप्प्यातील जागा संपादन केली आहे. मात्र, पैसे घेतले नाहीत असे तब्बल ३५ कोटी रुपये कोर्टात जमा केले आहेत. दुसऱ्या टप्प्यातील फेज दोनची भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. यासाठी ३५ कोटी लागणार आहेत.

एस.टी. महामंडळ, रेल्वे, राज्य उत्पादन शुल्क, दुग्धविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विद्युत महामंडळ, पोस्ट विभाग, वस्त्रोद्योग महामंडळ, बीएसएनएल विभाग आणि पोलिस विभागाच्या जागा बाधित होणार आहेत. या सर्व जागा शासनाच्या आहेत. त्यांना पयार्यी जागा दिली आहे. त्यामुळे मोबदला देण्याचा प्रश्न येत नाही. इमारतींचा मोबदला दिला जाणार आहे. त्यामुळे भूसंपदानाचे लाखो रुपये वाचले आहेत.

पान १ वरून

## देसाईनगर येथे २० एमएलडी...

कडून कार्यकारी अभियंता प्रवीण पाटील, उपअभियंता (यांत्रिकी) राजकुमार आवळे, शाखा अभियंता एम. हरीश, अभियंता कासिम नदाफ यांनीही प्रकल्पाच्या प्रगतीची माहिती दिली. यावेळी मान्यवरांनी कामांची पाहणी करून प्रकल्प लवकर पूर्ण करून कार्यान्वित करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरातील सांडपाण्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन होऊन पर्यावरण संवर्धनासह नागरिकांना मोठा फायदा होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## सोलापुरात बनावट नोटांचा...

झेरॉक्स मशीनवर बनावट नोटा तयार करून त्या खऱ्या असल्याचा भास निर्माण करत बाजारात चालवण्याचा डाव जेलरोड पोलिसांनी उधळून लावलाय. राजू विश्वनाथ चोरमुले आणि अतुल भागवत तावरे असे सांगोला येथील दोन आरोपींना अटक केली. नोटा झेरॉक्स काढून खऱ्या नोटांसारख्या तयार केल्याचे उघड झालं आहे. जेलरोड पोलिसांनी एक खबरीच्या माध्यमातून 35 हजाराच्या मोबदल्यात एक लाख दहा हजार बनावट नोटा देण्याचं आमिष दाखवून सापळा लावला होता. या प्रकरणात आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. तत्पूर्वी, नागपूरच्या कामठीत बनावट नोटांचा पर्दाफाश करण्यात आला. या प्रकरणी तीन व्यार्पायांना अटक केली. या कारवाईने नागपूरकरांचंही टेन्शन वाढलं आहे.

# गेले अनेक वर्षापासून बंद असलेली बैलगाडा शर्यत देवाभाऊ यांनी सुरू केली- राम सातपुते

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** शंभू महादेवाचे वाहन नंदी हिंदू धर्मामध्ये गाईला माता म्हणतो आणि या गोमातेचे संवर्धन झाले पाहिजे या भावनेने देवाभाऊ यांनी ही बैलगाडा शर्यत पुन्हा सुरू केली. धर्माच्या विरोधात काही लोक असतात ते कोर्टात गेले त्यांनी वेगवेगळ्या अडचणी आणल्या परंतु अनेक वषार्पासून बंद असलेली बैलगाडा शर्यत भारतीय जनता पाटीर्चे सरकार देवाभाऊ यांनी सुरू केली असल्याचे मत मा.आ. राम सातपुते यांनी व्यक्त केले.



ते श्री क्षेत्र महालक्ष्मी ग्रामविकास प्रतिष्ठान पुरंदावडे सदाशिवनगर यांच्या वतीने मा.आ.राम सातपुते यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या देवाभाऊ केसरी बैलगाडा शर्यतीच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. ते पुढे बोलत असताना म्हणाले की माळशिरस तालुक्यामध्ये दोन ताकती एकत्र असताना देखील या तालुक्यांमध्ये कडवी झुंज द्यायचे काम एक भारतीय जनता पाटीर्चा कार्यकर्ता करतो आहे. प्रस्थापिता विरोधात संघर्ष करण्याची जी भूमिका आहे या भूमिकेला या निवडणुकीपासून अधिक बळ आले आहे. येथील जनता आमच्या सोबत आहे दोन ताकती एकत्र आहेत एकटे एकटे जर आले असते तर दोघांना एका एका खिशात घालायचे काम इथल्या भाजपच्या कार्यकर्त्यांनी केले असते. ही लढाई आज उद्याची नाही पुढील २५ वर्षाची लढाई डोक्यात ठेवून भाजपचा कार्यकर्ता काम करतो आहे. या तालुक्यामध्ये मी आमदार असताना १०० कोटी, २००, कोटी ५०० ची कामी आणायचो परंतु काल अर्थसंकल्प झाला जुन्याच कामाला १०, २० एक कोटी निधी भेटला आणि स्वतःला भाजपचे म्हणून घेणारे लोक सोशल मीडियावर मिरवायला लागले. मी त्यांना सांगतो हे डबल ढोलकीच सगळे लक्षात आले आहे. पंधरा दिवसाची आमदारकी राहिली ती संभाळा असा टोला प्रस्थापिताला राम सातपुते यांनी दिला. तसेच मा. खा. रंजीत नाईक निंबाळकर यांनी या तालुक्यातील बावीस गावांना पाणी आणलं पाहिजे म्हणून पहिल्यांदा मी विधानसभेत आणि रणजीत नाईक निंबाळकर यांनी लोकसभेत आवाज उठवला. फलटण कडून कामाला सुरुवात झाली आहे. आपला गिरवी, भांब,रेडे, पिलीव या सगळ्या भागाला त्या गावांमध्ये पाणी येईल हा शंभू महादेवाचा पावन असणारा परिसर येत्या काळामध्ये त्याला पाणी पोहोचेल असा विश्वास माजी आमदार राम सातपुते यांनी माळशिरस तालुक्यातील जनतेला दिला. यावेळी भाजप नेते फलटणचे नगराध्यक्ष समशेर नाईक निंबाळकर, सोलापूर जिल्हा परिषद सदस्य संस्कृती सातपुते, आप्पासाहेब देशमुख, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत जाधव, माळशिरस पंचायत समिती सदस्य सोनू परांडे, पंचायत समिती गटनेते शेळके, आनंद शेंडगे, भाजपाचे जिल्हा महामंत्री सचिन शिंदे, ऋतुजा मोरे, हरिदास पाटील, रामभाऊ कचरे, जयंत खंडागळे, संजय देशमुख, अमर माने देशमुख, अमृत माने देशमुख, शरद मदने, गोपाळ घाडगे पाटील, हरी पालवे, बैलगाडा संघटनेचे राज्य अध्यक्ष तसेच पदाधिकारी उपस्थित होते उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते देवाभाऊ केसरी बैलगाडा शर्यत स्पधेर्तील विजेते स्वरा गायकवाड करंजेपूल यांचा लखन व थैमान ग्रुप साखरवाडी यांचा बावऱ्या,साईनाथ पवार पैलवान ग्रुप शनी शिंगणापूर यांचा चीत्र्या व १०/१० सरकार ग्रुप सदाशिवनगर यांचा रोमन,राजाभाऊ भोसले निमसाखर यांचा देवा व अशपाक कलंदर संभाजीनगर यांचा बादल,विक्रम गोरे रांजणी अक्कलकोट यांचा छावा व भैय्या जाधव पळशी यांचा रायफल. तर सहा व सात क्रमांक विभागून देण्यात आला स्पधेर्साठी प्रथम क्रमांकाचे बक्षीस म्हणून देवाभाऊ चषक व २ लाख द्वितीय १ लाख, ५० हजार, तृतीय१ लाख चतुर्थ ७५ हजार,पंचम- ५० हजार,सहावे ३० हजार अशी बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आली. स्पर्धा पुरंदावडे तालुका माळशिरस श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळ या ठिकाणी घेण्यात आल्या होत्या बसण्यासाठी प्रेक्षकांना दोन्ही साईटला मोठी भव्य दिव्य गॅलरी उभारण्यात आली होती लाखोच्या संख्येने प्रेक्षक देवा भाऊ केसरी बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी उपस्थित झाले होते.

बैलाच्या पाठीवर हात ठेवून हुर्रे म्हणत धुरकरी आपल्या बैलांना हाकारत होता. डोळ्याचे पाते लवते न लवते तोवर धुरळा उडवत बैलगाडे ट्रॅकवरून सुसाट धावत होते. निमगावच्या भारत वळकुंडेच्या सावकारने अन कचरेवाडीच्या तात्यासो कचरे यांच्या सुंदरने वायुवेगाने झेप घेत ९०० फुटांचा ट्रॅक केवळ १७ सेकंदांत पार करत जेतेपद पटकावले. देवाभाऊ चषक व दोन लाख रुपयांचे इनाम विजेत्यांना देण्यात आले. पुरंदावडे सदाशिवनगर (ता. माळशिरस) येथील पालखी तळ पटांगण प्रेक्षकांच्या आरोळ्यांनी दणाणून गेले होते. स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजी नगर पुणे जालना रायगड ठाणे सोलापूर सातारा सांगली या जिल्ह्यातून ४६० बैलगाडे सहभागी झाले होते. स्पर्धेमध्ये आठ गाड्यांचा एक लॉट सोडण्यात येत होता. असे एकूण ५१ वेळा बैलगाडे पळवले. केवळ २२/२३ सेकंदात एक राउंड पूर्ण होत होता. अत्यंत रोमहर्षक स्पर्धा पार पडली. प्रथम सर्वात पुढे असणारा बैलगाडा शेवटच्या टप्प्यात कधी मागे पडायचा हेही कळत नव्हते. माजी आमदार राम सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र महालक्ष्मी प्रतिष्ठान पुरंदावडे सदाशिवनगर आयोजित बैलगाडा स्पधेर्तील तिसऱ्या वषार्तील देवाभाऊ केसरी चषक व रोख रुपये दोन लाख झामाचे निमगावच्या भारत वळकुंडे यांचा तात्यासो कचरे यांच्या सुंदर मानकरी ठरले. या प्रतिष्ठानच्या वतीने गेली ३ वर्षापासून पुरंदावडे येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळावर या बैलगाडा स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. ट्रॅकच्या दोन्ही बाजूंनी प्रेक्षकांना बसण्यासाठी गॅलरी व त्यावर मंडप उभारण्यात आला होता. नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत जाधव व विठ्ठल पालवे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन केले.

## वात्रटिका

### ज्वाळा आणि झळा

गॅस टंचाईमुळे अनेक
व्यवसाय गॅसवर आले...
युद्ध तिकडे होतय पण
इकडे परिणाम झाले...
रोज भडकतच आहेत
युद्धाच्या तिकडे ज्वाळा...
भांडणाशी देणंघेणं नाही
तरीही बसतात त्यांना झळा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अकलूज येथे 14 मार्च रोजी भव्य ओपन बैलगाडा शर्यत



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, आनंदनगर शिवकिर्ती शेतीफार्म (अकलूज - चाकोरे रोड) येथे १४ मार्च रोजी भव्य ओपन बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कृषि उत्पन्न बाजार समिती अकलूज येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना पुढे मोहिते-पाटील म्हणाले कि, सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधुन, श्री विजय गणेशोत्सव मंडळ शंकरनगर अकलूज यांच्या वतीने,भव्य ओपन बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे.१४ मार्च रोजी सकाळी ८ वाजता, स्पर्धेला सुरुवात होणार असून, १३ मार्च सायं ६ वा. पर्यंत स्पर्धकांनी नावे नोंद करावीत असे आवाहन यावेळी मोहिते पाटील यांनी केले.

गेल्यावर्षी ४५० स्पर्धकांनी शर्यतीत भाग घेतला होता. यावेळी ५०० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी होतील असा विश्वास व्यक्त करत,स्पर्धेतील मैदानाची लांबी १ हजार फुट पर्यंत ठेवली आहे. महाराष्ट्र राज्य बैलगाडा शर्यती संघ व माळशिरस तालुका संघ यांच्या नियमावली स्पर्धेला लागू होणार आहेत. शिवाय स्पर्धेचे चित्रीकरणही करण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्याकरीता १ हजार रुपए प्रवेश फी आकारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### तर प्रथम क्रमांकाच्या बैलगाडीस

१ लाख ५० हजार रुपये व चषक देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास १ लाख १० हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकास ७१ हजार रुपये व चषक, चतुर्थ क्रमांकास ६१ हजार रुपये व चषक, पाचव्या क्रमांकास ५१ हजार रुपये व चषक, सहाव्या क्रमांकास ३१ हजार रुपये व चषक, सातव्या क्रमांकास २१ हजार रुपए व चषक,आठव्या क्रमांकास ११ हजार रुपए व चषक देण्यात येणार असून, प्रथम क्रमांकाच्या बैलास झुली, बाशिंग, शेंब्या घालून, तुळशीहार घालून, त्याचा सन्मान करण्यात येणार आहे असे मदनसिंह मोहिते पाटील म्हणाले.

सदरच्या स्पर्धेचे नियोजन ट्रस्टी अर्जुनसिंह मोहिते पाटील हे श्री विजय गणेशोत्सव मंडळाचे कार्याध्यक्ष तथा आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली करत आहेत.

यावेळी ट्रस्टी भिमराव काळे, चंद्रकांत कुंभार, लक्ष्मण पवार, देवीदास ढोपे, लखन चव्हाण, विठ्ठल अर्जुन, श्रीकांत राऊत, संतोब शिंदे, सचिव काकडे उपस्थित होते.

# अक्कलकोट तालुक्यासाठी २५ कोटींचा निधी मंजूर
## रस्ते व पुलांच्या कामांना गती : आ. सचिन कल्याणशेट्टी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यातील रस्ते सुधारणा, पूल बांधकाम व विविध पायाभूत सुविधा विकासकामांसाठी राज्य सरकारकडून २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सादर झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्पातून अक्कलकोट तालुक्यातील सात विविध विकासकामांसाठी हा निधी मंजूर झाला आहे.

या निधीमुळे तालुक्यातील रस्ते सुधारणा व पूल बांधणीच्या कामांना गती मिळणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनमानात सकारात्मक बदल घडणार असल्याचे आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये आरळी गावाजवळ पुलाचे बांधकाम (३.५० कोटी रुपये), गोरेगाव ते हंडूर रस्ता सुधारणा (७.५० कोटी), सात अंजनी ते उदगीर रस्ता सुधारणा (४.५० कोटी), चुंगी ते कुडू रस्ता सुधारणा (२ कोटी), शावळपूर ते शावळ गाव रस्ता सुधारणा (५० लाख), वळसंग ते तीर्थ रस्ता सुधारणा (५.५० कोटी) तसेच धोत्री ते गोकुळ साखर कारखाना रस्ता सुधारणा (५.५० कोटी) या कामांचा समावेश आहे.

'विकसित महाराष्ट्र २०४७' या दूरदृष्टीसमोर ठेवून राज्य सरकार ग्रामीण व शहरी भागातील विकासाला समान प्राधान्य देत आहे.

अक्कलकोट तालुक्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मंजूर झालेला हा निधी निश्चितच विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वासही आ. कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला.

# हंगामअखेर ऊस व तोडणी-वाहतूक बिल अदा करणारा विठ्ठलराव शिंदे कारखाना एकमेव - मा.आ. बबनराव शिंदे





**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट क्र. १ पिंपळनेर व युनिट क्र. २ करकंब या दोन्ही युनिटचा सन २०२५-२६ गळीत हंगाम संपल्यानंतर ऊस तोडणी-वाहतूक बिल वाहनमालकांच्या खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा. आ. बबनराव शिंदे यांनी दिली. दि. १ ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीतील ऊस तोडणी-वाहतूक बिलाची रक्कम अदा करण्यात आली असून हंगामअखेर एकूण १७८ कोटी ४४ लाख रुपये तोडणी-वाहतूक बिलासाठी देण्यात आले आहेत. त्यामुळे हंगामअखेर ऊस बिल व तोडणी-वाहतूक बिल पूर्णपणे अदा करणारा विठ्ठलराव शिंदे कारखाना हा एकमेव कारखाना ठरला आहे.

**हंगामाचा आढावा**
- एकूण गाळप : २०,७९,०१३ मे. टन ऊस
- साखर उत्पादन १५,२०,०५० क्विंटल ऊस दर ३०२५ प्रति मे. टन
- ऊस बिल अदा : ६२८ कोटी ८९ लाख
- तोडणी-वाहतूक बिल : १७८ कोटी ४४ लाख
- कामगारांना : १०% पगारवाढ व १५ दिवसांचा बोनस

पिंपळनेर येथील युनिट क्र. १ कडे १५ लाख ५४ हजार ५६२ मे. टन ऊसाचे गाळप होऊन १० लाख ३३ हजार ९०० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. तर करकंब येथील युनिट क्र. २ कडे ५ लाख २४ हजार ४५१ मे. टन ऊसाचे गाळप होऊन ४ लाख ८६ हजार १५० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. अशा प्रकारे दोन्ही युनिट मिळून एकूण २० लाख ७९ हजार ०१३ मे. टन ऊसाचे गाळप होऊन १५ लाख २० हजार ०५० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे.

या हंगामात गाळपास आलेल्या ऊसाला प्रति मे. टन ३०२५ रुपये प्रमाणे दर देण्यात आला असून हंगामअखेर ऊस बिलासाठी एकूण ६२८ कोटी ८९ लाख रुपये अदा करण्यात आले आहेत. तसेच हंगामाच्या सुरुवातीपासून दर १० दिवसांनी ऊस बिलाचे पेमेंट देणारा विठ्ठलराव शिंदे कारखाना हा एकमेव कारखाना असल्याचेही मा. आ. बबनराव शिंदे यांनी सांगितले.

त्रिपक्षीय करारानुसार कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांना जानेवारी २०२६ पासून १० टक्के पगारवाढ लागू करण्यात आली असून ती पगारात देण्यात येत आहे. तसेच सन २०२५-२६ च्या यशस्वी हंगामानिमित्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांना १५ दिवसांचा पगार बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.

सन २०२६-२७ चा पुढील गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व सभासद व ऊस उत्पादकांनी आपल्या ऊस नोंदी कारखान्याकडे करून सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकारी संचालक डॉ. संतोष डिग्रजे यांनी केले.

# सोलापूरात भक्ती व शौर्याचा संगम; सप्तम श्याम वंदना महोत्सवात हजारो भाविकांची उपस्थिती





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** झंवर मळा येथे रविवारी आयोजित सप्तम श्याम वंदना महोत्सवात भक्तीभाव आणि शौर्यकलेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. सोनी सिस्टर्स यांच्या मधुर भजनांवर हजारो भाविकांनी नृत्य करत भक्तिरसात तल्लीन होत असतानाच केरळच्या कलाकारांनी सादर केलेल्या कलरीपयटू युद्धकलेच्या थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या महोत्सवाचे आयोजन श्री श्याम मंदिर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दुपारी चार वाजता पंडित गोविंद खंडेलवाल यांच्या हस्ते अखंड ज्योत प्रज्वलित करून करण्यात आली. त्यानंतर दिल्लीच्या चिराग ग्रुपने सादर केलेल्या 'भोला नाचे मेरा शमशानी में' या नृत्याविष्काराने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पुढे सोनी सिस्टर्स यांनी सादर केलेल्या

'अच्युतम केशवम, 'नाता जोड़ा है श्याम से' आणि 'तीन बाण के धारी' या भजनांवर सुमारे दोन हजार भाविकांनी भक्तिभावाने नृत्य केले.

कार्यक्रमातील 'शीश के दानी' प्रसंग सादर करताना सभामंडपात भावनिक वातावरण निर्माण झाले. श्रीकृष्णांसमोर श्री खाटू श्याम बाबांचे शीर अर्पण करण्याच्या दृश्यावेळी भाविक भावविवश झाले. अखंड ज्योतीसमोर येऊन प्रत्येक भाविकाने तेल अर्पण करत 'शीश के दानी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री खाटू श्याम बाबांच्या चरणी नतमस्तक होत श्रद्धा व्यक्त केली.

यावेळी गोपाल खंडेलवाल, आनंद खंडेलवाल, सूर्यकांत खंडेलवाल, शाम खंडेलवाल, अनुपम खंडेलवाल आणि संदीप खंडेलवाल उपस्थित होते.

कार्यक्रमात केरळमधील १२ कलाकारांनी प्राचीन कलरीपयटू युद्धकलेची साहसी प्रात्यक्षिके सादर केली.

दंडवत प्रणाम, पुलीअंगम, अंगासाधनम, मेयथारी यांसारख्या प्रकारांसह कोलथारी प्रकारातील केड्डुकारी व चेरूवाडी तंत्रांचे प्रदर्शन करण्यात आले. तसेच अंक्यारी प्रकारात खंजीर, तलवार-बाल परिस आणि उरूमी (लवचिक तलवार) या शस्त्रांच्या साहसी हालचालींचे सादरीकरण करण्यात आले.

'वेरूम काई'या तंत्राद्वारे शत्रूचा हल्ला रोखणे, पकड घेणे आणि निशस्त्र लढ्याचे कौशल्यही दाखविण्यात आले. विशेषतः महिला व मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देणारे हे प्रात्यक्षिक ठरले.

कार्यक्रमाच्या शेवटी राधा-कृष्णांच्या रासलीलेचे मनमोहक सादरीकरण करण्यात आले. दिल्लीच्या चिराग ग्रुपच्या कलाकारांनी सादर केलेल्या या रासलीलेने कार्यक्रमात भक्तिमय रंग भरले. त्यानंतर सुमारे तीन हजार भाविकांच्या उपस्थितीत श्री खाटू श्याम बाबांची भव्य महाआरती करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता भाजी, पुरी, पापड, खीर आणि चपातीसह महाप्रसाद वितरणाने झाली.

# संत बाळूमामा उत्सवानिमित्त बेलाटी येथे धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल



**बेलाटी (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील विजापूर बायपास रोडजवळ असलेल्या श्री संत बाळूमामा मंदिरात संत बाळूमामा उत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला आहे. मंदिर ट्रस्टच्या वतीने ९ ते २० मार्च या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीतील भाविकांमध्ये उत्सवाबद्दल उत्साहाचे वातावरण आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही आदमापूरप्रमाणेच बेलाटी येथे संत बाळूमामा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जात आहे. सोमवार, ९ मार्च रोजी मंदिरात वात घालणे, वीणापूजन तसेच रंगपंचमी व एकनाथ षष्ठी कार्यक्रमाने उत्सवाची सुरुवात झाली. सोमवार, १६ मार्च रोजी उत्सवाची सांगता होऊन उपवास सोडण्याचा कार्यक्रम होणार आहे.

९ ते १६ मार्च या कालावधीत मंदिरात दररोज कीर्तन, भजन, महाआरती व महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, १५ मार्च रोजी संत बाळूमामा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.


बुधवार, १८ मार्च रोजी अमावास्यानिमित्त सकाळी ६ वाजता संत बाळूमामांच्या मूर्तीला अभिषेक करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ७ वाजता महाआरती व महाप्रसाद होणार आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ७ या वेळेत दिवसभर धनगरी ओव्या, भजन व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता महाआरती होईल.

तसेच गुरुवार, १९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रीराम मंदिर भूमिपूजन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. शुक्रवार, २० मार्च रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन संत बाळूमामा मंदिरात साजरा करण्यात येणार असून दुपारी १२.३० वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अधिष्ठानाजवळ गुलालाचे कीर्तन होणार आहे.

या सर्व कार्यक्रमांमध्ये पंचक्रोशीतील भाविकांनी सहभागी होऊन कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष पाटील-बेलाटीकर यांनी केले आहे.

यावेळी राम हणमंत पाटील, श्रीकांत श्रीराम पाटील, विजय श्रीराम पाटील, जयजयराम श्रीकांत पाटील, बाल कीर्तनकार गुंड महाराज आदी उपस्थित होते.

# सांगोला पंचायत समितीवर तालुका विकास आघाडीचाच झेंडा फडकणार : आ. डॉ. बाबासाहेब देशमुख



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** शिव, शाहू, फुले, आंबेडकर आणि स्व. आबासाहेब गणपतराव देशमुख यांच्या विचारातून स्थापन झालेल्या सांगोला तालुका विकास आघाडीचा विचार पुढे नेणे ही आपली जबाबदारी आहे. या भूमिकेशी दीपक साळुंखेही ठाम असल्याने सांगोला पंचायत समितीचा सभापती व उपसभापती तालुका विकास आघाडीचाच होईल, असा ठाम विश्वास शेतकरी कामगार पक्षाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केला.

शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटनेच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांची विचार विनिमय बैठक सांगोला येथील स्व. गणपतराव देशमुख सूतगिरणी येथे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी ते बोलत होते.

बैठकीस नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य किरण पांढरे, सोमा मोटे, सिंधूताई आलदर, पंचायत समिती सदस्य अमृत पाटील, स्मिता गोडसे, सुवर्णा नवले, छाया कोळेकर, काजल काशीद, वंदना शेळके, तसेच पक्षाचे शहर चिटणीस विजय राऊत, तालुका चिटणीस दादासाहेब बाबर, महिला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे सांगोला तालुका विकास आघाडीला यश मिळाले असल्याचे सांगत आमदार देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले.

दरम्यान, येत्या १२ मार्च रोजी होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांचे रणशिंगही या बैठकीत फुंकण्यात आले. भविष्यकाळात होऊ घातलेल्या ६७ ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेबाबत गावपातळीवरील कार्यकर्त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी सांगोला पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाच्या निवडीसंदर्भात कार्यकर्त्यांशी चर्चा करून सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले. तसेच स्व. आबासाहेब देशमुख यांच्या विचारांचे तळागाळात प्रसार करण्यासाठी पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचे आवाहन करण्यात आले.

# लायन्स क्लब अक्कलकोटतर्फे महिला दिन साजरा



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटच्या वतीने ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. लायन्स क्लबचे अध्यक्ष ला. अभय खोबरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. या निमित्ताने लायन्स शिशु व प्राथमिक शाळा, अक्कलकोट येथील सर्व शिक्षिका व शिक्षकेतर महिला कर्मचारी यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात माजी नगराध्यक्षा सौ. अनिता अभय खोबरे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन महिलांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला ट्रस्ट चेअरमन ला. राजेंद्र हत्ते, ला. मल्लीनाथ साखरे, झोन चेअरमन ला. मल्लिकार्जुन मसुती, ला. शिरीष पंडीत, ला. सुभाष गडसिंग, ला. शदीद वळसंगकर तसेच ट्रस्ट सचिव ला. शिवशरण खुबा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका खुने मॅडम तसेच निलगार मॅडम यांचीही उपस्थिती होती. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी महिला शिक्षिकांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला.

विद्यार्थ्यांच्या घडणीत महिलांचे मोलाचे स्थान असून त्यांच्या समर्पणामुळे समाजाची प्रगती होत असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमात महिला शक्तीचा सन्मान करत समाजातील त्यांच्या मोलाच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# कुणबी दाखल्यासाठी करमाळ्यात आंदोलनाची तयारी; मनोज जरांगे पाटील यांचा इशारा



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** कुणबी दाखले मिळवण्याच्या प्रक्रियेत प्रशासनाकडून अडवणूक होत असल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

प्रसंगी करमाळ्यातही आंदोलन उभारले जाईल, असा इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

मनोज जरांगे पाटील यांनी करमाळा येथे धावती भेट देत कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मराठा समाजातील विविध प्रश्न आणि विशेषतः कुणबी दाखले मिळण्यात येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सचिन काळे, संभाजी ब्रिगेडचे नितीन खटके, मकाईचे संचालक अमोल यादव, ॲड. नवनाथ राखुंडे, दिग्विजय घोलप, विकास गलांडे, बापूसाहेब शिरगिरे पाटील, ज्योतीराम लावंड, मुस्तकीम पठाण, गणेश कुकडे यांच्यासह करमाळा तालुक्यातील शेकडो समाजबांधव उपस्थित होते. कुर्डवाडी प्रांत कार्यालयाकडून कुणबी दाखल्याबाबत अडवणूक होत असल्याच्या तक्रारी कार्यकर्त्यांनी जरांगे पाटील यांच्यासमोर मांडल्या. यावर त्यांनी समाजाने संघटित होऊन आंदोलनात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सचिन काळे यांनी सांगितले की, मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार कुणबी दाखल्याच्या प्रश्नासाठी लवकरच जनआंदोलन उभारून उपोषणाचा मार्ग स्वीकारला जाईल.

शासन व प्रशासनाकडून समाजाची पिळवणूक किंवा फसवणूक होत असेल आणि कुणबी दाखले रखडवले जात असतील तर न्याय मिळवण्यासाठी समाज रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पोलिसाची नोकरी व कुटुंब यांची यशस्वी सांगड घालून विविध आव्हानांचा सामना करीत गुन्ह्यांचा उत्कृष्ट तपास समुपदेशनाद्वारे मोडणारे संसार वाचवणे त्याचबरोबर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पोलीस महिला अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मान जागतिक महिला दिनानिमित्त शहर पोलीस स्टेशनच्या वतीने सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे व शहर पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा व शालेय विद्यार्थ्यांनीचा सन्मान करण्यासाठी पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्यावतीने पोलीस संकुल पंढरपूर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आजच्या समाजव्यवस्थेत स्त्रिया कुटुंब, सेवा, शिक्षण तसेच सामाजिक क्षेत्रात अत्यंत जबाबदारीने कार्य करत आहेत. तसेच सर्वच क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण करत आहेत. जिद्द, निष्ठा आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. तसेच समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीतही मोलाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे आजचा दिवस केवळ त्यांचा सन्मान करण्याचा नाही, तर त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवण्याचा असल्याचे मत सहा. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी पंढरपूर उपविभागातील महिला अधिकारी, पोलीस ठाणे येथील महिला पोलिस अंमलदार तसेच पंढरपूर शहरातील प्रतिष्ठीत महिला, डॉक्टर, महाविद्यालयीन शिक्षिका व शालेय विद्यार्थिनी यांचा सन्मान करण्यात आलेला आहे.

# विद्यापीठे व महाविद्यालयांतील रिक्त पदे भरण्याची आ मोहिते पाटील यांची मागणी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या मोठ्या प्रमाणातील रिक्त पदांमुळे उच्च शिक्षण व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असल्याचा मुद्दा विधानपरिषदेत उपस्थित करत आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी ही पदे तातडीने भरण्याची मागणी केली. राज्यात सुमारे १३,००० सहाय्यक प्राध्यापक पदे रिक्त असल्यामुळे अनेक महाविद्यालयांना तासिका तत्त्वावर किंवा कंत्राटी प्राध्यापकांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे अध्यापनाची सातत्यता, संशोधनाची गुणवत्ता तसेच संस्थांच्या मानांकन प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होत असल्याची बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

तसेच राज्यातील अनेक महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची कमतरता असल्यामुळे विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर बिघडत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. राज्यातील उच्च शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता टिकवण्यासाठी उर्वरित रिक्त प्राध्यापक पदे निश्चित कालमर्यादेत भरण्याचा ठोस कार्यक्रम जाहीर करावा, तसेच दीर्घकाळ सेवा देणाऱ्या तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या अनुभवाला न्याय देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रश्नाला उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले की, ११ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहाय्यक प्राध्यापक पदभरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राज्यातील ११,९१८ रिक्त पदांपैकी ५,०१२ पदांच्या भरतीस शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती त्यांनी दिली.

तसेच सार्वजनिक विद्यापीठांमधील पदभरतीसाठी शासनाने सुधारित निकष निश्चित केले असून शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ६० टक्के, अध्यापन कौशल्य मूल्यमापनासाठी २० टक्के आणि मुलाखतीतील कामगिरीसाठी २० टक्के गुण या पद्धतीनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.तसेच या शैक्षणिक वर्षापासून रिक्त पदांचा प्रश्न राहणार नाही, असे सांगत तासिका तत्त्वावरील शिक्षकांना जाहिरातीनुसार संधी मिळेल,असेही त्यांनी सभागृहात स्पष्ट केले.